# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

लेखा व वित्त विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in

E-mail – account@pcmcindia.gov.in


जावक.क्र.लेखा/२९/कावि/८० /२०२४ दिनांक :-१० /०६/२०२४

## परिपत्रक

विषय :- निविदा समितीपुढे सादर केल्या जाणा-या विषयांबाबत.

मनपाच्या विविध भांडवली विभागांमार्फत विकास कामांच्या निविदा प्रसिध्दीकामी व निविदा दर उघडल्यानंतर निविदा मंजूरीचे विषय निविदा समितीपुढे सादर करणेबाबत मा.आयुक्त सो यांचे आदेशानुसार निविदा समिती गठीत करणेत आलेली आहे. निविदा समितीच्या बैठकीदरम्यान निविदा समिती सदस्यांना सादर केले जाणारे विषय व अनुषंगिक आवश्यक असलेली माहिती बैठकी पूर्वी प्राप्त होत नाही. त्यामुळे बैठकी दरम्यान सादर केल्या जाणा-या विषयांवर सविस्तर चर्चा करणे शक्य होत नाही. निविदा समितीपुढे सादर केले जाणारे सर्व विषयांची सुची व त्या विषयांसंदर्भात आवश्यक असलेली अनुषंगिक सर्व माहिती निविदा समिती सदस्यांना संबंधित विभागांनी बैठकीचे आयोजनापुर्वी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

सबब, सर्व विभागप्रमुखांना सुचीत करणेत येते की, निविदा समितीपुढे सादर केल्या जाणा-या विषयांची सुची व अनुषंगिक माहिती सर्व निविदा समिती सदस्यांना बैठकीच्या २ कार्यालयीन दिवसांच्या आगोदर देणेत यावी. सदर परिपत्रकाची सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी व सर्व संबंधित कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

( शेखर सिंह )
आयुक्त तथ प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रति:- सर्व संबंधित विभागप्रमुख